।। श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः।।

प.प.श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीविरचिता

श्रीदत्तचम्पू

मराठी भाषांतर

वृत्तालंकारविवरण

पं.श्रीपादशास्त्री तापस, मुळगुंद

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः।

श्री. वासदेवानन्दसरस्वतीयतीन्द्रचरणारविन्दाभ्यां नमः ।

अलङ्कार म्हणजे काय? (अलङ्कारसामान्यलक्षणम्)

'अत्रिनन्दनपादाब्जवन्दनं बहुनन्दनम्' या वाक्यातील शब्दश्रवणानें किंवा अर्थज्ञानानें जो चमत्कार (आनंद) प्रतीतीस येतो; तो 'दत्तपादनमस्कारो बहुसौख्यप्रदायकः' या वाक्यांतील शब्दांच्या अथवा अर्थाच्या ज्ञानापासून-तात्पर्यार्थ समान असला तरी-येत. नाहीं यावरून दुसऱ्या वाक्यापेक्षां पहिल्या वाक्यांतील शब्दांत व अर्थात कांही तरी वैशिष्ट्य असलें पाहिजे हें उघड आहे. अशा वैशिष्ट्यालाच अलंकार असें म्हणतात. हीच गोष्ट एखाद्या नियमाच्या (लक्षणाच्या) रूपानें सांगणे झाल्यास अशी सांगतां येईल -

शब्दांमध्यें किंवा अर्थामध्यें असलेल्या ज्या विशिष्ट धर्माच्या (पदार्थाच्या) योगानें त्या शब्दांचें अथवा अर्थाचें ज्ञान विशिष्ट आनन्द उत्पन्न करतें तो धर्म (पदार्थ) म्हणजे **अलंकार** होय. उदाहरणार्थ घेतललेल्या वरील वाक्यांत 'वन्दनम्, नन्दनम्' या शब्दांमध्ये वर्णसाम्यरूपी **अनुप्रास** हा धर्म असून त्यामुळेंच या शब्दांचें ज्ञान आपणांस विशिष्ट आनन्द देतें म्हणून येथें अनुप्रास हा अलङ्कार होतो. हा धर्म शब्दगत असून अर्थाशीं याचा कांही सम्बन्ध नाहीं-अर्थात् अर्थज्ञान नसतांही केवल एतादृशशब्दश्रवणानेंच आनन्दानुभव होतो म्हणून हा शब्दालङ्कार होय. याच उदाहरणामध्ये 'पादाब्जम्' या ठिकाणी, (पादः अब्जमिव असा उपमितसमास केल्यानें) अब्जाचें म्हणजें कमलाचें साधर्म्य (सादृश्य) दत्तचरणरूपी अर्थामध्यें असून त्या योगानेंच त्या अर्थाचें ज्ञान विशिष्ट आनन्द देतें म्हणून येथें साधर्म्य अर्थात् उपमा हा अलंकार होतो. हा धर्म अर्थगत आहे-अर्थाचें ज्ञान नसेल तर केवल शब्दश्रवणानें (पादाब्जम्) या स्थळीं आनन्दानुभव होत नाहीं- म्हणून हा अर्थालङ्कार म्हटला जातो.

हे सादृश्य वगैर पदार्थ जर व्यङ्ग्य (व्यञ्जनावृत्तिगम्य) असतील तर त्यांना अलंकार न म्हणतां अलंकारध्वनि म्हणतात. पण रस भाव वगैरे कांहीं पदार्थ व्यंग्य असले तरी त्यांची मात्र 'रसवान्, प्रेयः-' अशी अलंकारांतच गणना करण्याचा संप्रदाय आहे.

अलंकाराच्या सामान्य स्वरूपाबद्दलचे हे विचार शास्त्रीय भाषेच्या चौकटींत बसवून चन्द्रिका (कुवलयानन्दटीका)कारांनीं असें व्यक्त केले आहेत-'अलङ्कारत्वं च रसादिभिन्नव्यङ्ग्यभिन्नत्वे सति शब्दार्थन्यतरनिष्ठा या विषयितासम्बन्धावच्छिन्ना चमत्कृतिजनकतावच्छेदकता तदवच्छेदकत्वम्। अनुप्रासादिविशिष्टशब्दज्ञानादुपमादिविशिष्टार्थज्ञानाच्च चमत्कारोदयात्तेषु लक्षणसमन्वयः। शब्दार्थयोर्ज्ञाननिष्ठचमत्कृतिजनकताया विषयितयाऽवच्छेदकत्वेन, तद्विशेषणीभूतानुप्रासोपमादे-स्तन्निष्ठावच्छेदकतावच्छेदकत्वात्। रसवदाद्यलङ्कारसङ्ग्रहाय व्यङ्ग्योपमादिवारणाय च भैदद्वयगर्भसत्यन्तोपादानम् । (**'विषयितासम्बन्धावच्छिन्ननिवेशाचें प्रयोजन अद्याप अनिर्णीत आहे असें**

म्हणतात.)

प्रसिध्द नाट्यशास्त्रकार भरतमुनींनीं यमक हा एकच शब्दालंकार सांगितला असून त्यानंतरच्या ग्रंथकारांनी 'वृत्त्यनुप्रास, लाटानुप्रास, पुनरुक्तप्रतीकाश' इत्यादि अनेक शब्दालंकार सांगितले आहेत. (त्रिशतीवृत्तादिविवरणांत १ ल्या श्लोकांत यांपैकी कांही अलंकारांचीं लक्षणें जयदेवकवींचे सोदाहरण श्लोक देवून दाखविलीं आहेत) शिवाय हार, चक्र, सर्वतोभद्र इत्यादि बंधांचाही शब्दालंकारांतच समावेश होतो (यांपैकीं हार वगैरे कांही बन्ध श्रीमहाराजांनीं त्रिशतीच्या शेवटी ग्रथित केले आहेत. त्रिशती सर्ग ३ श्लोक १०२ इ. पहा.) अर्थालंकारांच्या संख्येबद्दलहि प्राचीन ग्रंथकारांचा मतभेद फारच आढळतो. भरतमुनीनीं उपमा, दीपक आणि रूपक हे तीनच अर्थालंकार मानले असून महाकवि दंडीनीं ते पसतीस सांगितले आहेत. काव्यप्रकाशकारानीं ती संख्या बासष्टापर्यंत नेली तर चन्द्रालोककारानीं 'इत्यलङ्कृतयः शतम्' म्हणून १०० (शतक) पूर्ण केलें आहे. चन्द्रालोकव्याख्याकार (कुवलयानन्दकार) अप्पय्यदीक्षितांनीं जवळ जवळ आणखी पावशतकाची त्यांत भर टाकली आहे.

अलंकारसंख्येबद्दल असा मतभेद होण्यास त्या त्या ग्रंथकारांचा दृष्टिकोणभेदच प्रमुख कारण आहे. रूपक, उत्प्रेक्षा, अतिशयोक्ति इत्यादि (२०-२५) अलंकारांचा, उपमेतच अंतर्भाव मानल्यानें भरतमुनीनीं त्यांचा निराळा उल्लेख केला नाहीं. पण इतर ग्रंथकारांना त्या अलंकारांचें चमत्कृतिजनकत्व अन्यादृश (उपमेपेक्षा विलक्षण) वाटल्यामुळें त्यांनी त्यांचीं नावें व लक्षणें निराळीं दाखविलीं. भारतीयांचे पदार्थविज्ञानशास्त्र अर्थात् न्यायशास्त्रांतही पदार्थांच्या संख्येबद्दल असाच मतभेद आढळतो. गौतममुनीनीं १६ पदार्थ मानले तर कणादऋषीनीं सहाच सांगितलें आहेत. नव्य नैय्यायिकांनीं-जणू त्या दोघांत तडजोड घडविण्याकरितां-सात पदार्थ प्रतिपादिले आहेत. पण हा सर्व संख्याविषयक मतभेद, स्वसंमत ठराविक पदार्थांत इतर पदार्थांचा अन्तर्भाव मानणें अगर न मागणें यांवरच आधारलेला असून कोणीही कोणत्याही प्रसिध्द पदार्थाचें असत्त्व किंवा अप्रामाणिकत्व, अगर अप्रसिध्द पदार्थाचें सत्त्व किंवा प्रामाणिकत्व मानीत नाहीं-मानूं शकत नाहीं-ही गोष्ट जरूर लक्षांत ठेवली पाहिजे. प्रकृत अलंकारांच्या बाबतींतही हीच स्थिति आहे. आतां एका अलंकारांत इतर अनेक अलंकारांचा अन्तर्भाव मानणें कसें शक्य आहे हें समजून घेण्याकरितां आधी 'श्रीदत्तस्य वदनं कमलमिव मनोहरम्' हें उपमालंकारघटित वाक्य उदाहरणार्थ घेऊन यांत थोडासा बदल केल्यानें निरनिराळे अनेक अलंकार कसे बनतात तें पाहूं-'कमलं वदनमिव' प्रतीप, 'वदनं वदनमिव' अनन्वय, 'कमलमिव वदनं वदनमिव कमलम्' उपमेयोपमा, 'वदनमेव कमलम्' रूपक, 'कमलं दृष्ट्वा वदनं स्मरामि' स्मृति, 'वदनं वा कमलं वा' सन्देह, 'नेदं वदनं किन्तु कमलम्' अपन्हुति 'मन्ये कमलमिदं वदनम्' उत्प्रेक्षा, 'सर्वदा विकसितं वदनं कमलादधिकमनोहरम्' व्यतिरेक, 'कमलधिक्करणं वदनम्' अतिशयोक्ति असाच थोडा फेरबदल केल्यानें तुल्ययोगिता, भ्रान्तिमान् निरर्शना, दृष्टान्त इत्यादि अलंकारही तयार होतात. सरते शेवटीं या सर्वांचें पर्यवसान सादृश्यामध्येंच होतें म्हणून यांचा अन्तर्भाव उपमालंकारांत होवू शकतो. पण या सर्वांचें चमत्कृतिजनकत्व मात्र सर्वत्र केवळ सादृश्यमूलक नाहीं. रूपकामध्यें तें अभेदारोपमूलक, व्यतिरेकामध्यें आधिक्यमूलक असें निरनिराळें

आहें. या दृष्टीनें विचार करून या अलंकारांचीं नावें व लक्षणें विभिन्न मानलीं तर त्यांतही कांहीं वावगें नाहीं. असो. या प्राचीन अर्वाचीन ग्रंथकारांनी सांगितलेल्या सर्व अलंकारांत वर लिहिलेले वैद्यनाथांचे (चन्द्रिकाकारांचें) लक्षण सुसमन्वित होत असल्यानें तें अलंकारांचे निर्दुष्ट सामान्य लक्षण म्हणून गणलें गेलें आहे.

या लक्षणांतील 'चमत्कृतिजनकता' हा अंश फार महत्वाचा आहे. अलंकाराच्या प्रत्येक विशेष लक्षणांत 'चमत्कृतिजनकत्वे सति' हें पालुपद पाहिजेच. त्या त्या अलंकारास लागणारी इतर सर्व सामुग्री तयार असून देखील हें 'चमत्कृतिजनकत्व' नसेल तर ती सामुग्री वायां जाणार अर्थात् तेथें कोणताही अलंकार निष्पन्न होणार नाहीं. आणि ही चमत्कृति उत्पन्न होण्यास सादृश्यादि पदार्थ सत्यसृष्टींतले चालत नाहींत तर ते कविप्रतिभानिर्मित असावे लागतात. 'वदनं कमलमिव पार्थिवम्, अथवा 'वदनं घट इव भौतिकम्' या वाक्यांमध्यें उपमालङ्कारास लागणारी सर्व सामग्री-म्हणजे उपमान, उपमेय. साधारण धर्म व सादृश्यवाचकशब्द-सिध्द असली तरी ती नैसर्गिक आहे, कविप्रतिभा निर्मित नाहीं म्हणून चमत्कृति नाहीं. अत एव येथें उपमालङ्कारही निष्पन्न होत नाही. अर्थात् असल्या सादृश्याला अलङ्कारत्व येत नाही. हा नियम प्रत्येक अलंकारास लागू आहे.

वृत्तालंकारविवरण.

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः ।

१ श्लेषालङ्कार ।

अनेकार्थी शब्दाच्या योजनेला श्लेष म्हणतात. (नानार्थस्य शब्दस्य योजनं श्लेषः । (चन्द्रिका)) शब्दश्लेष व अर्थश्लेष असें त्याचे दोन प्रकार असतात. प्रकृत शब्दाच्याऐवजीं दुसऱ्या पर्यायशब्दाचा प्रयोग, विवक्षित अनेक अर्थांचा बोध करून देण्यास समर्थ होत नसेल तर तो शब्दश्लेष व दुसऱ्या पर्याय शब्दानेंहि विवक्षित अर्थांचा बोध होत असेल तर तो अर्थश्लेष. (परिवृत्तिसहानां श्लिष्टानां शब्दानामनेकार्थप्रतिपादकत्वेऽर्थश्लेषः । (काव्यप्रकाशटीका बालबोधिनी)

प्रकृत श्रीदत्तचम्पूच्या मंगलश्लोकामध्यें 'अम्बासुतः' या व्द्यर्थी शब्दाची योजना असल्यानें येथें श्लेषालंकार आहे. (अम्बा=पार्वती व श्रीनरसिंहसरस्वतींची माता) अम्बा शब्दाच्या ऐवजी गिरिजा, दाक्षायणी इत्यादिकांपैकीं एखाद्या पर्याय शब्दाचा या ठिकाणीं प्रयोग केल्यास त्या (गिरिजासुतः इ.) शब्दानें गणपतीचा बोध झाला तरी श्रीनरसिंहसरस्वतींचा बोध होत नाहीं. कारण 'अम्बा' ही त्यांच्या मातोश्रींची संज्ञा म्हणजें नांव असून त्यांत पर्याय प्रयोग चालत नाही. एवंच, असें-केल्यास येथें विवक्षित उभयार्थबोध होत नाहीं अर्थात् शब्दपरिवृत्तिसहत्व नाहीं म्हणून हा **शब्दश्लेष** होय.

'द्विजराजो राजते' या वाक्यांतहि 'द्विजराजः' हा शब्द श्लिष्ट म्हणजे, चन्द्र व श्रेष्ठ ब्राह्मण या दोन अर्थांचा बोधक आहे. पण या ठिकाणीं द्विज, राजन् या शब्दांऐवजीं क्रमानें ब्राह्मण नृप इत्यादि पर्यायांचा प्रयोग केला तरी विवक्षित उभयार्थबोधाला कांही बाध नसल्यानें हा **अर्थश्लेष** आहे.

दुसऱ्या अर्थाच्या बोधाकरितां निराळ्या रीतीनें पद तोडावें लागलें तर त्या सभङ्गश्लेष, व तसें न करताच दोनही अर्थांचा बोध होत असेल तर त्यास अभङ्गश्लेष म्हणतात. वर दोन्हीं उदाहरणें अभङ्गश्लेषाचींच होत. त्रिशती काव्यांतील 'तिष्ये गन्धर्वस्थः-' या श्लोकांतल्या 'सभ्योमाधवतनयः' या शब्दांत सभङ्गश्लेष आहे. (त्रिशतीकाव्य सर्ग १ श्लोक १५ पाहा)

'श्लेषः स वाक्य एकस्मिन्यत्रानेकार्थता भवेत्' असें काव्यप्रकाशकारांनीं या अलंकाराचें लक्षण सांगितलें आहे. 'श्लिष्यतः अर्थावस्मिन् श्लिष्यन्ति अर्था अस्मिन्निति वा श्लेषः' अशी श्लेष शब्दाची व्युत्पत्ति आहे. अर्थात् या अलंकाराचें 'श्लेष' हें नांव अन्वर्थक आहें. (सर्व अलंकारांची नांवें बहुतेक अशीं अन्वर्थकच आहेत.)

१-१, १-१३, १-२४, १-३८, १-३९, १-४०, ३-१४

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः ।

२ पर्यायोक्तम्

विवक्षित व्यंग्यार्थ, स्वरूपानें न सांगता सुन्दर अशा प्रकारान्तरानें सांगितल्यास त्यास पर्यायोक्त म्हणतात. (विवक्षितमर्थं साक्षादकथयित्वा प्रकारान्तरेण कथनं पर्यायोक्तम् । का.टी.बा.) अलंकारशास्त्राच्या भाषेंत या प्रकारास 'व्यञ्जना[१] वृत्तीनें वाच्यार्थाचा बोध करून देणें' असें म्हणतात.

बहुतेक सर्व ठिकाणीं वाच्यार्थ आणि व्यंग्यार्थ निरनिराळे असून व्यंग्यार्थ, वाच्यार्थापेक्षां (गूढ व) जास्त सुंदर असतो. पण क्वचित् स्थळीं व्यंग्यार्थापेक्षां वाच्यार्थच जास्त सुंदर असला तर व्यंगार्थ आपल्या रूपानें प्रकट न होता त्या वाचार्थांच्या रूपानेंच प्रकट होतो. अर्थात् अशा स्थळांत अभिधावृत्तीनें ज्या अर्थाचा बोध होतो व्यंजनावृत्तीनेंहि त्याच अर्थाचा बोध होतो, म्हणजें पर्यवसानीं व्यंग्यार्थ आणि वाच्यार्थ एक होतात. असें झालें कीं पर्यायोक्त हा अलंकार तयार होतो.

कोणी थोर मोठे लोक आपल्याकडें आलें कीं आपण त्यांना विनयानें (आगम्यताम्) 'इदमासनमलङ्क्रियताम्' असें म्हणतों. येथें विवक्षित व्यंग्यार्थ 'अस्मिन्नासने उपविश' असा आहे. पण (वाच्यार्थाइतका तो रमणीय नसल्यानें) व्यञ्जनावृत्ति, त्या रूपानें त्याचा बोध न करता वाच्यार्थरूपानें - 'इदमासनमलङिक्रयताम्' याच रूपानें - बोध करते, अर्थात् आता व्यंग्यार्थ आणि वाच्यार्थ यांमध्यें कांही भेद राहिला नाही. म्हणून (इदमासनमलङ्क्रियताम्) या ठिकाणीं पर्यायोक्त अलंकार आहे. तसेंच 'अयं म्रियताम्' या अभिप्रायानें '(अनेन) कीनाशभवनातिथिना भाव्यम्' असें म्हटल्यास त्या स्थळींहि हा अलंकार असणारच. पण खरोखरच एखाद्या (सिंहासनासारख्या) आसनाची (रत्नादिकांनीं) सजावट करण्याकरितां (सोनाराला वगैरे उद्देशून) 'इदमासनमलङ्क्रियताम्' हें वाक्य उच्चारलें, किंवा याच देहानें यमाच्या घरीं अतिथीरूपानें जाण्याची योग्यता बाळगणा-या (नचिकेतासारख्या) एकाद्या धीर पुरुषाला उद्देशून 'त्वं कीनाशभवनातिथिर्भव' असें म्हटलें, तर तेथें मात्र पर्यायोक्त अलंकार होणार नाहीं. कारण त्या स्थळीं विवक्षित अर्थाचा बोध केवळ अभिधेनेच होत असून मुळी व्यंजनाच नाहीं; मग व्यंगार्थ आणि त्याचें प्रकारान्तराने प्रतिपादन कुठून असणार, ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे.

'पर्यायोक्तं विना वाच्यवाचकत्वेन यद्वचः' (का. प्र.) असें या अलंकाराचें लक्षण असून 'पर्योयेण=प्रकारान्तरेण उक्तं=कथनं पर्यायोक्तम्' अशी या शब्दाची व्युत्पत्ति आहे. १-६.

(१) अलंकार शास्त्रांत, वाचक, लाक्षणिक आणि व्यञ्जक असें शब्दाचें तीन प्रकार सांगितलें आहेत. त्यांच्या अर्थांना क्रमानें वाच्य, लक्ष्य आणि व्यंग्य अशा संज्ञा आहेत. या अर्थांच्या बोधास कारणीभूत (शब्दगत) विशिष्टशक्तींना क्रमानें अभिधा लक्षणा आणि व्यञ्जना असें म्हणतात. शब्द उच्चारल्याबरोबर प्रतीत होणारा अर्थ 'वाच्य' अनुपपत्तीमुळें भासणारा अर्थ 'लक्ष्य' म्हटला जातो.

उदा. 'गङ्गायां घोषः' या ठिकाणीं 'गङ्गा शब्दाचा वाचार्थ 'जलप्रवाहविशेष' असा असून या प्रवाहांत घोष म्ह.गौळवाडा असणें शक्य नाहीं हें लक्षांत आलें कीं (त्याअनुपपत्तीमुळें) आपण गंगाशब्दाचा अर्थ 'गंगेचें तीर' (कांठ) असा करतो. हाच लक्ष्यार्थ होय. पण येवढ्याच अर्थाची विवक्षा असली तर सरळ 'गङ्गातीरे घोषः' असें न म्हणता हा द्राविडी प्राणायाम (गङ्गायां घोषः असें असंबध्द सांगून मग तीरबोधाकरितां लक्षणा मानणें) का? या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं-वक्त्यांची या ठिकाणीं इतकीच विवक्षा नसून 'शैत्य पावनत्वादिविशिष्ट म्ह.गार आणि पवित्र अशा गंगेच्या कांठीं' इतक्या अर्थांचा विवक्षेनें त्यानें 'गङ्गापदानें कसा (कोणत्या वृत्तीनें) होतो हें पाहिलें पाहिजें. अभिधा, प्रवाहरूप अर्थाच्या ठिकाणीं नियंत्रित आहे, अर्थात् या शैत्यपावनत्वादिरूप अर्थामध्यें गङ्गाशब्द संकेतित नाहीं म्हणून ती (अभिधा) हा विशिष्ट अर्थ बोधण्यास असमर्थ आहे. ('तीर' इतका अर्थ स्वीकारल्याबरोबर) अनुपपत्तीचा परिहार होत असल्यानें लक्षणाही गप्प बसते. तेव्हां या अर्थाच्या बोधाकरिता शब्दामध्यें एक तिसरी वृत्ति मानणें अपरिहार्य आहे. या वृत्तीचें नांवच व्यञ्जना ['गङ्गातीरे घोषः' इति प्रयोगे स्वायत्ते सत्यपि गङ्गायां घोषः' इत्यनन्विताभिधानं शैत्यपावनत्वादिप्रतिपत्त्यर्थम् इत्यङ्गीकर्तव्यम् । न च सा प्रतीतिर्लक्षणयाऽप्युपपद्यते । केवल तीरलक्षणयैवानुपपत्तिपरिहारे शैत्यपावनत्वादिविशिष्टलक्षणायां मानाभावात्।..... तस्मात् शैत्यपावनत्वादिप्रतिपत्त्यर्थ व्यञ्जना आवश्यकी (नीलकण्ठी शब्दखंड)] या वृत्तीनें प्रतीत होणा-या अर्थास व्यंगार्थ म्हणतात.

अभिधा आणि लक्षणा सर्व शास्त्रकारांनीं मानल्या असून ही व्यंजना मात्र आलंकारिकांचा स्वतंत्र प्रतिभाविलास आहे. ही त्यांना जीव कीं प्राण वाटते. कोणत्याहि काव्यांत ही जर नसेल - सर्वथा भासत नसेल - तर तें काव्य अधम निर्जीव - समजलें जातें. ही केवळ शब्दांमध्येंच रहात नसून (परमेश्वराप्रमाणें) सर्व पदार्थांत भरली आहे. ['सर्वेषां प्रायशोऽर्थांनां व्यञ्जकत्वमपीष्यते' का. प्र.] सहकारिकारणांच्या योगानें यथावसर प्रकट होते. हिच्यापासून केळ व्यंग्यार्थांचाच बोध होत नसून प्रसंग विशेषी वाच्यार्थाचाहि बोध होतो. (असें आलंकारिकांचे मत आहे. प्रकृत पर्यायोक्त अलंकारांत, हा म्हणजे व्यञ्जनावृत्तीनें वाच्यार्थाचा बोध करून देणें हा-प्रकार असतो.

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः ।

३ उपमा

कोणत्याहि दोन वस्तूंच्या सुंदर साद्दश्यास उपमा म्हणतात. [अलङ्कारत्वे सति साद्दश्यमुपमालङ्कारलक्षणं बोध्यम्।- चंद्रिका.] हा अलंकार तयार होण्यास उपमान, उपमेय, साधारणधर्म आणि साद्दश्यवाचक (इव यथा वगैरे) शब्द असे चार पदार्थ पाहिजेत. अमुक वस्तु अमक्या सारखी आहे असें वर्णन करावयाचें असल्यास हा अलंकार वापरतात ही गोष्ट प्रसिध्दच आहे. ज्या पदार्थाचें साद्दश्य सांगावयाचें आहे (यालाच 'साद्दश्यप्रतियोगी' अशी संज्ञा शास्त्रीय भाषेंत देतात) त्या पदार्थास उपमान, ज्या ठिकाणीं तें साद्दश्य सांगणें आहे (म्ह. साद्दश्यानुयोगी). त्यास उपमेय म्हणतात. यांपैकीं उपमान हें बहुतेक उपमेयापेक्षां उत्कृष्ट म्ह. अधिकगुणविशिष्ट' असें असतें. (**परमेश्वराचें किंवा तत्समान सद्‌गुरूंचें वर्णन करणें झाल्यास असलें अधिक गुणशाली उपमान मिळणें सर्वथा अशक्यच. कारण त्यांच्या तोडीचा पदार्थच जर जगांत कोणताहि नाहीं. तेव्हां त्यांच्याहून श्रेष्ठ कसा असणार? ('न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यः' - गीता. 'दृष्टान्तो नैव द्दष्टस्त्रिभुवनजठरे सद्‌गुरोः' - शतश्लोकी.) अर्थात् तशा ठिकाणिं उपमानोपमेयभाव हा सर्वथा गौणच असतो. हा विषय (वरदराजस्तवामध्यें) (श्री.अप्पय्या दीक्षितांनीं किती सुंदर सांगितला आहे. पहा -**

'यस्मिञ्जहात्यतिशयोक्तिरलङ्कृतित्वं न्यूनोपमात्वमुपमा समुपैति सर्वा।
सूक्ष्मस्वभावकलनाऽपि च न प्रतर्क्या तद्वर्णयामि भवतः कथमाभिरूप्यम्।।')

साधारणधर्म म्हणजे उपमान आणि उपमेय या दोनहि पदार्थात राहणारा विशिष्ट गुण. हा उपमानामध्यें बहुतेक सिध्द असून उपमेयांत याचें विधान करावयाचें असतें. कांहीं ठिकाणीं उपमानोपमेयांचे धर्म वस्तुतः विभिन्न असले तरी श्लेषानें अथवा बिम्बप्रतिबिम्बभावानें (**बिम्बप्रतिबिम्बभावाचें स्पष्टीकरण पुढें दृष्टान्तालंकारांत केलें जाईल.**) त्यांचे ऐक्य साधलें जातें. (त्रिशती काव्य सर्ग १ श्लोक २० पाहा.) आणि उपमेय हें, उपमानासारखें आहे असा बोध करून देणा-या ('इव' इत्यादि) शब्दास साद्दश्यवाचकशब्द म्हणतात तें साद्दश्य निसर्गनिर्मित नसून कविप्रतिभाकल्पित असावें लागतें. हें आपण मागें (अलंकार सामान्यलक्षणामध्यें) पाहिलेंच आहे.

'(श्रीदत्तस्य) वदनं कमलमिव मनोहरम्' या आपल्या परिचित वाक्यांत, आपणांस कमळाचें साद्दश्य; वदनाच्या म्ह. मुखाच्या ठिकाणी सांगावयाचें आहे म्हणून कमल हें उपमान व वदन उपमेय होय. मनोहरत्व अर्थात् 'आल्हादकत्व' हा साधारण धर्म असून इव हा साद्दश्यवाचक शब्द आहे. आणि मुखाच्या ठिकाणी कमलाचें साद्दश्य नैसर्गिक नसून कल्पित आहे (कारण, वस्तुतः कमळाचें आल्हादकत्व (मनोहरत्व) निराळें आणि मुखाचें निराळें. असें असूनहि त्या दोनहि आल्हादकत्वांचें काल्पनिक ऐक्य सिध्दवत् गृहीत धरून कवि, 'वदनं कमलमिव मनोहरम्' इत्यादि प्रयोग करीत असतो) म्हणून या वाक्यांत उपमालंकार निष्पन्न होतो.

या अलंकाराचे पूर्णोपमा आणि लुप्तोपमा असे दोन मुख्य प्रभेद आहेत. उपमान, उपमेय,

साधारणधर्म, व वाचकशब्द हे चारहि अवयव शब्दांनीं सांगितलें गेले असतील तर ती पूर्णोपमा होते यांपैकीं कांही पदार्थांचा म्हणजे पदार्थबोधक शब्दांचा लोप झाला असेल-उपमा वाक्यांत निर्देश केला नसेल - तर तिला लुप्तोपमा म्हणतात. पूर्णोपमेचें उदाहरण वर दिलेंच आहें. त्याच वाक्यांत 'कमलं, मनोहरम्' अशीं व्यस्त पदें न ठेवतां 'कमलमनोहरम्' असें सामसिकपद ठेवलें आणि इवशब्द काढून टाकला म्हणजें (श्रीदत्तस्य) 'वदनं कमलमनोहरम्' असें वाक्य तयार होतें. या वाक्यात 'उपमानानि सामान्यवचनैः (२.१.)' या पाणिनीय सूत्राच्या आधारे झालेल्या समासाच्या जोरावरच आपणांस साद्दश्याचें ज्ञान होतें. साद्दश्यवाचक कोणताही शब्द प्रत्यक्ष नाहीं- म्हूणून या उपमेस 'लुप्ता' त्यांतहि वाचकशब्दाचा लोप झाल्यानें 'वाचकलुप्ता' -म्हणतात. 'लुप्ता' त्यांतहि वाचकशब्दाचा लोप झाल्यानें 'वाचकलुप्ता'-म्हणतात. असाच साधारण धर्माचा लोप असल्यास 'धर्मलुप्ता' दोनहि लुप्त असल्यास 'धर्मवाचकलुप्ता' इत्यादि अनेक प्रकार या लुप्तोपमेचे संभवतात. यांपैकीं कांही पदार्थांचा लोप व्याकरणशास्त्रमूलक असतो तर काहींचा ऐच्छिक असतो. पूर्णोपमेचे सहा आणि लुप्तोपमेचे 'एकोणीस असें एकंदर पंचवीस प्रकार, या अलंकाराचे काव्यप्रकाशांत सांगितले आहेत. उपमेय एक व त्याचीं उपमानें अनेक असें झाल्यास मालोपमा तयार होते (त्रिशती ३-१०१ पहा).

'उपमा यत्र साद्दश्यलक्ष्मीरुल्लसति द्वयोः' असें कुवलयानंदांत या अलंकाराचें स्वरूप 'उपः समीपे मीयते परिच्छिद्यते (उपमानेन कर्त्रा उपमेयं कर्म) उनया इत्युपमा ' (का.प्र.टी.) अशी उपमा' शब्दाची व्यत्युत्ति आहे.

१-१०, १-१२, १-१३, १-१६, १-२३, १-३४, १-४०, १-४४, १-४६, १-४८, १-६३, १-६६, १-६९, १-७७, १-९२, १-९३, १-१००, १-१०१, १-१०९, १-११३, १-११४, १-१२६, १-१३४, २-१८, २-४१, २-५१, २-५७, २-७०, २-७५, २-७६, २-७७, २-७८, ३-१, ३-५, ३-२१, ३-२८, ३-३९, ३-४१, ३-४८, ३-७३, ३-७४, ३-८२, ३-८३, ३-८४, ३-९५, ३-९६.

४ दीपकम् ।

एका वाक्यामध्यें प्रस्तुत[१] आणि अप्रस्तुत वस्तूंचा साधारणधर्म अथवा क्रिया एकवारच सांगितल्यास दीपक हा अलंकार निष्पन्न होतो. [वर्ण्यावर्ण्यन्वितैकचमत्कारिधर्मो दीपकम्। (चन्द्रिका)] अर्थात् याचे दोन प्रकार असतात. एखाद्या क्रियेचा (क्रियारूपी धर्माचा) अनेक वस्तूंशी सम्बंध सांगणें हा एक, व एखाद्या (कर्ता कर्म वगैरे) कारकाचा अनेक क्रियेशीं संबंध सांगणें हा दुसरा. पहिल्या प्रकारास प्रकारास क्रियादीपक व दुस-या प्रकारास कारकदीपक म्हणतात. अशा वर्णनाचें पर्यवसान शेवटी प्रस्तुताप्रस्तुतांच्या सादृश्यामध्यें होते.

'भूष्यन्ते प्रमदवनानि बालपुष्पैः कामिन्यो मधुमांसलैर्विलासैः ।
ब्रह्माणः श्रुतिगदितैः क्रियाकलापै राजानो विरलितवैरिभिः प्रतापैः ।।'

(का.प्र.टी.) हें क्रियादीपकाचें उदाहरण आहे. यामध्यें भूषण=शोभणें-या एकाच क्रियेचा संबंध, प्रमदवन, कामिनी, ब्राह्मण, आणि राजेलोक या चारहि पदार्थांच्या ठिकाणीं सांगितला आहे.

दूरीकरोति कुमतिं विमलीकरोति चेतश्चिरन्तनमंघ चूलकीकरोति।
भूतेषु किञ्ज करुणां बहुलीकरोति सङ्गः सतां किमु न मङ्गलमातनोति? ।। (का.प्र.टी.)

या श्लोकामध्यें सत्संगरूपी एकाच कर्तृकारकाचा संबंध, दूरीकरण, विमलीकरण इत्यादि अनेक क्रियेच्या ठिकाणीं सांगितला असल्यानें हें कारकदीपकच होय. आपल्या श्रीदत्तचम्पूच्या चौदाव्या श्लोकांतहि हें कारकदीपकच आहे.

या अलंकाराचें लक्षण काव्यप्रकाशकारांनी 'सकृद्वृत्तिस्तु धर्मस्य प्रकृताप्रकृतात्मनाम् । सैव क्रियासु बह्वीषु कारकस्येति दीपकम् ।।' असें सांगितलें आहे. 'दीप इव दीपकम्' ('संज्ञायां च' पा.सू. ५.३.९७ इति इवार्थे कन्प्रत्ययः) अशी दीपक शब्दाची व्युत्पत्ति आहे. [प्रस्तुतैकनिष्ठः समानो धर्मः प्रसङ्गादन्यत्रोपकरोति, प्रासादार्थमारोपितो दीप इव रथ्यायामिती दीपसाम्याद्दीपकम् (कुवलयानंद)] १-१४, १-३२.

१) दोन्ही प्रस्तुत, दोन्ही अप्रस्तुत अथवा एक प्रस्तुत आणि एक अप्रस्तुत या तीन प्रकारांपैकीं कोणताहि प्रकार असला तरी हरकत नाहीं.

५ काव्यलिङ्गम्

सहसा न घडणारी एखादी गोष्ट घडली असें वर्णन केल्यास आतां तरी ती कां घडली? याबद्दल विशिष्ट कारण सांगून तिचें म्हणजे घडलेल्या गोष्टीचें समर्थन करावें लागतें, अशा सुंदर समर्थनासच काव्यलिङ्ग म्हणतात. ('स्वतोऽनुपपद्यमानार्थोपपादकहेतोर्वचनं काव्यलिङ्गम्' (चंद्रिका)] तें समर्थन करण्याकरितां दुस्या एक अथवा अनेक वाक्यांची रचना केली असेल तर त्यास वाक्यार्थहेतुक काव्यलिङ्ग, व तसें न करतां त्याच वाक्यांतील एखाद्या पदानें तें समर्थन केल्यास त्यास पदार्थहेतुक काव्यलिङ्ग असें नांव आहे.

'जितोऽसि मन्द कन्दर्प! मच्चित्तेऽस्ति त्रिलोचनः' असें वाक्यार्थहेतुक काव्यलिंगाचें उदाहरण कुवलयानंदांत दिलें आहे. या श्लोकार्धांतील पूर्वार्ध म्ह. 'जितोऽसि मन्द कन्दर्प' हें एक वाक्य असून 'मच्चित्तेऽस्ति त्रिलोचनः' हें दुसरें वाक्य आहे. नुसतें पहिलें वाक्य तेवढें ठेवलें तर 'मोठ मोठ्या ऋषिमुनींनाहि मदनाचा पराजय करणें कठीण असून तो याला कसा करतां आला?' अशी जिज्ञासा उत्पन्न होते. अर्थात् पहिल्या वाक्याला समर्थनाची अपेक्षा आहे. तें समर्थन, 'तृतीय नेत्रानें मदनाला जाळणारे भगवान् शङ्कर माझ्या हृदयांत अखंड वास करीत असल्यानें' असें विशिष्ट कारण सांगून दुस-या वाक्यानें केलें आहे म्हणून या ठिकाणी वाक्यार्थहेतुक काव्यलिंग आहे.

याच श्लोकार्थाचें उत्तरार्ध 'त्रिलोचनहृदा मया' असें केलें तर दोन वाक्यें न राहता' 'जितोऽसि मन्द कर्दप! त्रिलोचनहृदा मया' असें एकच वाक्य तयार होते. शङ्का समर्थन वगैरें वरच्यासारखेंच. पण तें समर्थन दुस-या वाक्यानें न होतां 'त्रिलोचनहृदा' या एका (सामासिक) पदानेंच होत आहे म्हणून हें पदार्थहेतुक काव्यलिंग होय. प्रकृत श्रीदत्तचम्पूच्या २१-२२ या दोन श्लोकांत 'स्तेनमेनं कालो हन्ति' 'भृत्यांहस्तुर्यभागभाक्' वगैरे कारणें देऊन कार्तवीर्यार्जुनानें साम्राज्यत्यागाचें समर्थन सुंदर रीतीनें केलें असल्यानें या दोन्ही श्लोकांत काव्यलिंग अलंकार आहे.

'हनूमानब्धिमतरद्दुष्करं किं महात्मनाम्!' या वाक्यांतहि उत्तरार्धानें पूर्वार्धाचे समर्थन केले आहे. पण या स्थळीं काव्यलिंग नसून अर्थान्तरन्यास हा अलंकार आहे. कारण, ' समर्थ्य आणि समर्थक यांच्यामध्यें कार्यकारणभाव इत्यादि कोणताहि संबंध असला तरी काव्यलिंग मानायला हरकत नाहीं. पण तो संबंध सामान्यविशेषभावरूपी जर असेल म्ह. सामान्यानें विशेषाचें किंवा विशेषाने सामान्याचें समर्थन केलें असेल तर तेथें काव्यालिंग न होतां अर्थान्तरन्यास निष्पन्न होतो' असा आलंकारिकांचा सिध्दांत आहे.

['समर्थ्यसमर्थकयोः सामान्यविशेषसम्बन्धेऽर्थान्तरन्यासः, तदितरसम्बन्धे काव्यलिङ्गम्' इत्येव व्यवस्थाऽवधारणीया (कुवलयानन्द)] म्हणूनच अर्थान्तरन्यासालंकाराच्या लक्षणामध्यें 'उक्तिरर्थान्तरन्यासः स्यात्सामान्यविशेषयोः' असा सामान्यविशेषभावसंबंधाचा स्पष्ट निर्देश केला आहे. वरील 'हनूमान-' या उदाहरणांत सामान्याने विशेषाचें समर्थन केलें असल्यामुळें अर्थान्तरन्यासच आहे. एवंच त्याच कुवलयानंदांत काव्यलिंगाचें लक्षण, 'समर्थनीयस्यार्थस्य काव्यलिङ् समर्थनम्' असें सामान्यतः जरी सांगितलें असलें तरी त्याचा निष्कर्ष 'सामान्यविशेषभावातिरिक्तसम्बन्धेन चमत्कारि समर्थनम्' असा करून घ्यावा लागतो.

'काव्ये लिङ्गम्' अशी या शब्दाची व्युत्पत्ति आहे. काव्यांतला चमत्कारक रीतीनें सांगितला जाणारा हेतु म्ह. समर्थक असा याचा अर्थ आहे. काव्यप्रकाशकारांनीं या अलंकाराचा निर्देश, काव्यहेतु; हेतु या नांवांनींहि केलेला आढळतो. कुवलयानंदकारांनीं 'हेतु' या नांवाचा स्वतंत्र अलंकार सांगितला आहे. (पहा-त्रिशतीकाव्य सर्ग १ श्लोक ८५).

१-२१, १-२२, १-५१, १-५२, १-११५.

६ विरोधाभासः

आपाततः विरुध्द पण पर्यवसानी म्ह. विचाराअंती अविरुध्द असें कोणतेहि (जाति, गुण, क्रिया इ.) दोन (किंवा अधिक) धर्म एका वस्तूच्या ठिकाणीं सांगितलें तर तो विरोधाभास अलंकार होतो. परंतु तो विरोध प्रसिध्द कार्यकारणभावभङ्गमूलक असतां कामा नये. [ऐकाधिकरण्येन प्रतीयमानयोः कार्यकारणत्वेनागृह्यमाणयोर्धर्मयोराभासमानापर्यवसन्नविरोधत्वं
(विरोधाभासालङ्कारस्य) लक्षणं द्रष्टव्यम् (चन्द्रिका) स्वाभाविक विरोधाचा कालभेदानें, श्लेषमूलक
विरोधाचा अर्थांतरपरिग्रहानें परिहार केला जात असतो. (विरोध आणि त्याचा परिहार यांचे आणखीहि कांहीं प्रकार संभवतात.)

प्रतीपभूपैरिव किं ततो भिया विरुध्दधर्मैरपि भेत्तृतोज्झिता।
अमित्रजिन्मित्रजिदोजसा स यद्विचारदृक् चारदृगप्यवर्तत ।।

(नैषध १-१३) या नैषध महाकाव्याच्या श्लोकांत कवीनें पुण्यश्लोक नलराजाच्या ठिकाणीं 'मित्रजित्व' आणि 'अमित्रजित्व' हे सकृद्दर्शनीं विरुध्द धर्म चमत्कारिक रीतीनें - श्लेषानें विरोधपरिहार करून-वर्णिलें आहेत. (मित्रजित्=सूर्याला जिंकणारा, अमित्रजित्=सूर्याला न जिंकणारा आणि अमित्रजित् शत्रूंना जिंकणारा). आपल्या प्रकृत दत्त चम्पूच्या (स्तबक १ गद्य ३०) गद्यांत 'अर्जुनमशोकं चकार' असा जो भाग आहे, त्यांतहि असा श्लेषमूलक विरोधाभासच आहे. कारण अर्जुन आणि अशोक हे दोन विजातीय वृक्षविशेष असून यांतील अर्जुनाला अशोक करणें कोणालाहि शक्य नसल्यानें विरोध भासतो, व अर्जुन म्ह. प्रकृत कार्तवीर्यार्जुन आणि त्याला अशोक म्ह. शोकरहित (दुःखरहित) करणें' असा दुसरा अर्थ लक्षांत आला कीं लगेंच त्या विरोधाचा परिहारहि होतो.

हा विरोध जर प्रसिध्द कार्यकारणभावभंगमूलक असेल म्हणजे कारणाशिवाय कार्योत्पत्ति झाल्याचें वर्णन असेल, तर त्या ठिकाणी विरोधाभास अलंकार न होतां 'विभावना' हा अलंकार निष्पन्न होतो. यांतहि आपाततः विरोध आणि विशिष्ट रीतीनें त्याचा परिहार असतोच. 'विभावना विनाऽपि स्यात्कारणं कार्यजन्म चेत्। अप्यलाक्षारसासिक्तं रक्तं तच्चरणद्वयम्।।' असें या अलंकाराचें सोदाहरण लक्षण कुवलयानंदांत दिलें आहे.

विरोधाचा परिहार होत नसेल अर्थात् खरोखरच जर विरोध असेल तर तो अलंकार नसून मोठा दोष होय.

'आभासत्वे विरोधस्य विरोधाभास इष्यते' (कुवलयानंद) असें यांचे लक्षण आहे. 'आ ईषद् (आपाततः) भासत इत्याभासः । आभासश्चासौ विरोधश्च विरोधाभासः । ('वाऽऽहिताग्न्यादिषु' २।२।३७ इति आभासशब्दस्य परनिपातः)' अशी या शब्दाची व्युत्पत्ति आहे. १-३०, १-१०६

८ अतिशयोक्तिः

१.केवळ उपमानवाचक शब्दानेंच उपमेयाचें वर्णन, २.(तीच असली तरी) ती वस्तु दुसरीच आहे असें वर्णन, ३.नसलेला संबंध असल्याचें वर्णन, ४.असलेला संबंध नसल्याचें वर्णन, ५.कार्य आणि कारण एकदम उत्पन्न झाल्याचें वर्णन, ६.केवळ कारणाच्या ज्ञानानेंच कार्योत्पत्ति झाल्याचे वर्णन, आणि ७.आधीं कार्याची, मग कारणाची उत्पत्ति झाल्याचें वर्णन या सातांपैकी कोणता तरी एक प्रकार असला कीं अतिशयोक्ति हा अलंकार असतो. अर्थात् या अलंकाराचे (अप्पय्यदीक्षितांच्या मताप्रमाणें) सात प्रभेद आहेत. प्रत्येक प्रकारांत 'चमत्कृतिजनकत्व' असलेंच पाहिजे ही गोष्ट सांगावयास नको. या सातहि प्रकारांची नांवें निरनिराळीं आहेत. ती जाणण्याकरितां कुवलयानंदांच्या अतिशयोक्तिप्रकरणांतील सात कारिकाच आपण पाहूं या. म्हणजे नांवाबरोबर उदाहरणांचेंहि ज्ञान होईल -'रूपकातिशयोक्तिः स्यान्निगीर्याध्यवसानतः[१]। पश्य नीलोत्पलद्वन्द्वान्निःसरन्ति शिताः शराः।। भेदकातिशयोक्तिस्तु तस्यैवान्यत्ववर्णनम् । अन्यदेवास्य गाम्भीर्यमन्यध्दैर्यं महीपतेः।। सम्बन्धातिशयोक्तिः स्यादयोगे योगकल्पनम् । सौधाग्राणि पुरस्यास्य स्पृशन्ति विधुमण्डलम्।। योगेऽप्ययोगोऽसम्बन्धातिशयोक्तिरितीर्यते। त्वयि दातरि राजेन्द्र । स्वर्द्रुमान्नाद्रियामहे ।। अक्रमातिशयोक्तिः स्यात्सहत्वे हेतुकार्ययोः । आलिङ्गन्ति समं देव । ज्यां शराश्च परांश्च ते ।। चपलातिशयोक्तिस्तु कार्ये हेतु प्रसक्तिजे । यास्यामीत्युदिते तन्व्या वलयोऽभवदूर्मिका ।। अत्यन्तातिशयोक्तिस्तु पौर्वापर्यव्यतिक्रमे । अग्रे मानो गतः पश्चादनुनीता प्रियेण सा।।'

श्रीदत्तचम्पूच्या 'सदयं हृदयं यस्य तेन प्रस्थापितोऽपि सः । वाचा मोचातिरसया स्थितश्चित्र इवाग्रतः।।' (स्तबक १ श्लोक ९२) या श्लोकांतील 'वाचा मोचातिरसया' या भागांत (वाणीमध्यें केळीपेक्षां जास्त गोडीचा संबंध वस्तुतः नसून तो आहे असें वर्णन केलें असल्यानें) यांतील तिसरा प्रकार म्ह. सम्बन्धातिशयोक्ति हा अलंकार आहे.

'अतिशयेन=सम्भवातिरेकेण योग्यताऽतिक्रमेण वा उक्तिः अतिशयोक्तिः अशी या शब्दाची व्युत्पत्ति आहे. याच अभिप्रायानें काव्यादर्शकारांनीं असें म्हटलें आहें - 'विवक्षा या विशेषस्य लोकसीमातिवर्तिनी । असाअतिशयोक्तिः स्यादलङ्कारोत्तमा यथा ।।'

१-९२, १-१०७, १-१०८, १-१२६, १,१४८, १-१५१, २,१६, २,८९, ३-२८, ३-६०, ३,८९, ३,९८.

१. (उपमेयवाचक शब्दानें उपमेयाचा निर्देश न करतां) उपमानवाचक शब्दानेंच उपमेयाचा निर्देश करून उपमेय हें उपमानच आहे असें भासविणें याला 'निगीर्याध्यवसान' म्हणतात. रूपकाप्रमाणें यांतहि हें ज्ञान आहार्य निश्चयात्मकच असतें. पण रूपकामध्यें उपमेयाचा स्वशब्दानें उल्लेख असतो, तो यांत नसतो. हा या दोन अलंकारांतील मुख्य फरक आहे. 'पश्य-' या उदाहरणांत 'नेत्र-कटाक्ष' हे उपमेयवाचक शब्द अजीबात टाळून 'नीलोत्पल, शर' या उपमानवाचक शब्दांनींच त्या उपमेयांचें ज्ञान, (उपमान रूपानें) कवि आपणांस करून देत आहे. म्हणून या ठिकाणीं 'रूपकातिशयोक्ति' हा अलंकार आहे. [विषयस्य स्वशब्देनोल्लेखनं विना विषयिवाचकेनैव शब्देन ग्रहणं विषयनिगरणं, तत्पूर्वकं विषयस्य विषयिरूपपतयाऽध्यवसानमाहार्यनिश्चयः' तस्मिन्सति

रूपकातिशयोक्तिः । यथा-नीलोत्पलशरशब्दाभ्यां लोचनयोः कटाक्षाणां च ग्रहणपूर्वकं तद्रूपताध्यवसानम् (कुवलयानंद)]

या अतिशयोक्ति अलंकाराची महती, याचें सामान्य लक्षण इत्यादिकांविषयीं चन्द्रिकाकारांनीं फार सुंदर विवेचन केलें असून त्यांतील कांही भाग खाली उध्दृत करीत आहे-

'रूपकाभिन्नत्वे सति चमत्कृतिजनकाहार्यारोपनिश्चयविषयत्वमेवातिशयोक्तिसामान्यलक्षणम्। रूपकवारणाय सत्यन्तम्, भ्रान्तिवारणायाहार्येति, उत्प्रेक्षानिरासाय निश्चयेति। रूपकातिशयोक्तावभेदस्य, द्वितीयप्रभेदेऽन्यत्त्वस्य, तृतीये सम्बन्धस्य, चतुर्थेऽसम्बन्धस्य, पञ्जमे सहत्वस्य, षष्ठे हेतुप्रसक्तिजन्यत्वस्य, सप्तमे पूर्वापरत्वयोश्च तथाविधाहार्यारोपविषयत्वसत्त्वात्सर्वत्र लक्षणसमन्वयः । न च एवंविधारोपस्य रूपकस्वभावोक्तिभिन्नेषु प्रायशः सर्वालङ्कारेषु सत्त्वादतिप्रसङ्ग इति वाच्यम् । इष्टापत्तेः । अलंङ्कारान्तराणां चमत्कारे प्रधानतया तदङ्गत्वेनावस्थिताया अतिशयोक्तेरप्राधान्येन व्यपदेशानर्हत्वात् । 'प्राधान्येन व्यपदेशा भवन्ति' इति न्यायादलङ्काराणामेव प्रधानत्वेन व्यपदेशार्हत्वात्।'अत एव काव्यप्रकाशकृता विशेषालङ्कारप्रसङ्गेऽभिहितम्- 'सर्वत्रैवंविधे विषयेऽतिशयोक्तिरेव प्राणत्वेनावतिष्ठते । तां विना प्रायेणालङ्कारत्त्वाभावात् । अत एवोक्तम्-' सैषा सर्वत्र वक्रोक्तिरनयार्थो विभाव्यते । यत्नोऽस्यां कविभिः कार्यः कोऽलङ्कारोऽनया विना ।।' इति । दण्डिनाऽप्युक्तम् - 'अलङ्कारान्तराणामप्येकमाहुः परायणम् । वागीशमहितामुक्तिमिमामतिशायह्वयाम्' इति ।

९ विभावना

'विरोधाभासः' पाहा

१-९४

७. रूपकम्

उपमान आणि उपमेय, परस्पर विरुध्द अशा आपापल्या विभिन्न स्वरूपांनीं ज्ञात होत असलीं तरी अत्यंत साम्य दाखविण्याकरितां त्यांच्यांत काल्पनिक अभेदाचा म्ह. ऐक्याचा आरोप करणें यास रूपक म्हणतात. [परस्परविरुध्दधर्मवत्त्वेनोपस्थिततया प्रकाशितभिन्नस्वरूपयोरप्युपमानोपमेययोरतिसाम्यप्रदर्शनाय काल्पनिकोऽभेदारोपो रूपकनामा अलङ्कारः
(का.प्र.टी.)].

'(श्रीदत्तस्य) मुखं चन्द्रः' या उदाहरणांत मुखरूपी उपमेय मुखत्वानें आणि चंद्ररूपी उपमान चंद्रत्वानेंच आपणांस ज्ञात होत आहे. अर्थात् मुखत्व आणि चंद्रत्व हे दोन्ही पदार्थ परस्पर विरुध्द आहेत म्हणजे एक ठिकाणीं राहणें शक्य नाहीं याची स्पष्ट कल्पना (ज्ञान) आपल्याला आहे. असें असलें तरी, ह्या दोन पदार्थांत फार फार साम्य आहे. हे दोन्ही पदार्थ अगदीं अगदीं एकमेकांसारखे आहेत - हें कळविण्याकरितां आपण यांच्यांत अभेदाचा ('मुखमेव चन्द्रः' असा) आरोप करतों म्हणून या ठिकाणी रूपकालंकार आहे. अशा आरोपज्ञानाला शास्त्रीय भाषेंत 'आहार्यज्ञान[१]' म्हणतात.

या रूपकालंकाराचे सांग आणि निरंग असे दोन मुख्य प्रभेद आहेत. अंगी म्ह. मुख्य रूपकाच्या परिपोषाकरितां तदङ्गभूत एक किंवा अधिक रूपकें असल्यास त्याला म्ह. अंगरूपकविशिष्टमुख्य रूपकाला सांगरूपक म्हणतात. (असें परिपोषक दुसरें रूपक नसून) मुख्य रूपक एकच असेल तर त्याला निरंग अथवा शुध्द रूपक असें नांव आहे. वर दिलेल्या 'मुखं चन्द्रः' या उदाहरणांत निरंगरूपक असल्याचें स्पष्ट आहे. '(भक्त) हृदयकुमुदविकासकः (श्रीदत्त) मुखचन्द्रः (शोभते)' या सविशेषण वाक्यांत 'मुखचन्द्रः' हें मुख्य रूपक, 'हृदयकुमुदम्' या परिपोषक अर्थात् अंगभूतरूपकानें युक्त असल्यानें सांगरूपक होय. 'हृदयकुमुदम्' हें रूपक नसलें तर 'मुखचन्द्रः' या रूपकाचें कांही अडतें असें नाहीं, पण तसें असलें तर त्याचा परिपोष होतो. म्ह. हें मुख्य रूपक जास्त खुलून दिसतं ही गोष्ट लक्षात ठेवावी.

अशा दोन रूपकांमध्यें जर निमित्तनैमित्तिकभाव असेल अर्थात् अंगरूपकाशिवाय अंगिरूपकाची (मुख्य रूपकाची) सिध्दि होत नसेल तर त्या विशिष्टरूपकाला 'परम्परितरूपक' असें नांव आहे. आपल्या श्रीदत्तचम्पूच्या (१-७८) 'योगोऽयं दुःखसंयोगवियोगो भोगसङ्गहृत्। हृद्दर्पसर्पसर्पघ्नः सुकृताद्व: कृतान्तकृत्।।' या श्लोकांत (समाधि) योगाच्या ठिकाणी सर्पघ्नाचा म्ह. गरुडाचा अभेदारोप केला आहे. या रूपकाला, अंगरूपक (म्ह. दर्पाच्या (अहंकाराच्या) ठायीं केलेला सर्पाचा अभेदारोप) निमित्त झालें आहे. (अर्थात् हें अंगरूपक नसतें तर 'योगः गरुडः' या मुख्य रूपकाची सिध्दी झाली नसती-तें मुख्य रूपक असंबध्द झालें असतें-) म्हणून हें परंपरितरूपक होय.

एका उपमेयाच्या ठिकाणीं अनेक उपमानांचा अभेदारोप केल्यास मालोपमेप्रमाणें मालारूपक तयार होतें. याशिवाय सांगरूपकाचें 'समस्तवस्तुविषय; एकदेशविवर्ति,' असे दोन, परंपरिताचे 'शिलष्ट, अश्लिष्ट' इ. चार असे, या रूपकाचे अनेक प्रभेद काव्यप्रकाशकारांनीं सांगितले आहेत.

'तद्रूपकमभेदो य उपमानोपमेययोः' (का.प्र.) असें या अलंकाराचें सामान्य लक्षण असून 'रूपयति=एकतां नयतीति रूपकम्' अशी रूपक शब्दाची व्युत्पत्ति आहे. १-७८, १-८७, १-९४, १-११२, १-१२९, १-१३४, २-२९, २-३६, २-४१, २-५४, २-६५, २-६९, २-७४, ३-२८, ३-७६, ३-८२.

१) मुख आणि चंद्र यांचें आल्हादकत्वादि साम्य लोकप्रसिध्द असून त्याच साम्याचें दार्ढ्य म्ह. आधिक्य दाखविण्याकरितां आपण त्यामध्यें अभेदारोप करू शकतों. पण योग आणि गरुड यांमध्यें असें कोणतेंच सादृश्य प्रसिध्द नसल्यानें त्यांत एकदम अभेदारोप होऊं शकत नाहीं. तर अगोदर त्यांचे साम्य दाखवावें लागतें. हें साम्य दाखविण्याचें काम अंगरूपक करतें. अर्थात् त्यामुळें 'गरुड जसा सर्पांचा नाश करतो तसा हा समाधि योग अहंकाराचा नाश करतो' असें ज्ञान होतें. आणि मग या साम्याच्या आधिक्याकरितां 'योगः सर्पघ्नः' असा अभेदारोप होऊं शकतो. एवंच सांग आणि परंपरित या दोन्ही रूपकांमध्यें अंगरूपक असतेंच.पण उपमानोपमेयांचें सादृश्य प्रसिध्द असेल तर 'सांग' आणि अप्रसिध्द असेल तर 'परंपरित' रूपक होतें हें यांतील मर्म आहे.

१० उत्प्रेक्षा

उपमेय हें जणूं उपमानच, आहे. अशा संभावनेला[१] (कल्पनेला) उत्प्रेक्षा म्हणतात. [उपमेयस्य उपमानत्वेन सम्भावना उत्प्रेक्षा इति निष्कर्षः (का.प्र.टी.) '(श्रीदत्तस्य) मुखं चन्द्रं मन्ये' या वाक्यांत 'मुख' या उपमेयाची 'चन्द्र' या उपमानाच्या रूपानें संभावना केली आहे. म्हणून उत्प्रेक्षालंकार आहे.

कारणरूपानें सम्भावना फलरूपानें सम्भावना, (एतद्भिन्न) सामान्य सम्भावना असें या अलंकाराचे तीन मुख्य प्रकार असून क्रमानें, हेतूत्प्रेक्षां फलोत्प्रेक्षा, वस्तूत्प्रेक्षा अशी त्यांची नांवें आहेत. वर दाखविलेली 'मुखं चन्द्रं मन्ये' ही वस्तूत्प्रेक्षा होय. कारण त्या वाक्यामध्यें कोणत्याहि कार्यकारणभावाची उत्प्रेक्षा न करितां केवल मुखाच्या ठायीं चन्द्रतादात्म्य उत्प्रेक्षिलें आहे, श्रीदत्तचम्पूच्या 'पद्मिभि सप्तधोत्सृष्टैर्दानोदैश्च सुगन्धिभिः। मुनेः पृथ्वी गन्धवतीत्युक्तिः सार्था कृता स्फुटम्।।' (१-१०७) या श्लोकांत 'गन्धवती पृथिवी' या न्यायशास्त्रवाक्याचें सार्थकीकरण, गजमदोदकत्यागाचें (वस्तुतः फळ नसून) फळ म्हणून वर्णिलें असल्यानें फलोत्प्रेक्षा आहे. याच चम्पूग्रंथाच्या 'वडवातनयः खण्डपिण्डाशीतीर्ष्ययाऽऽगताः । वडवातनयाः खण्डपिण्डाः सन्तो मृतं गताः ।।' (१-११०) या पद्यांत अश्वांच्या आगमनाला, विशिष्ट ईर्ष्या (वस्तुतः कारण नसून) कारण म्हणून वर्णन (संभावन) केल्यामुळें हेतूत्प्रेक्षा आहे. यांशिवाय 'उक्तविषया, अनुक्तविषया, सिध्दविषया, असिध्दविषया' इत्यादि अनेक अवांतर प्रकार या उत्प्रेक्षालंकाराचे सांगितले आहेत. साहित्यदर्पणांत यांची एकंदर संख्या १७६ दाखविली आहे.

हा अलंकार व्यक्त करण्याकरितां 'ध्रुवम्, प्रायः, नूनम्, मन्ये, शङ्के, अवैमि, ऊहे, जाने, उत्प्रेक्षे' इत्यादिकांपैकीं एखादा शब्द वापरीत असतात. उपमान[२] अप्रसिध्द असलें तर 'इव' शब्दहि उत्प्रेक्षाच दाखवितो. (उपमा प्रसिध्द असेल तर 'इव' शब्द उपमेचा बोधक होतो) अशा एखाद्या शब्दानें व्यक्त होणा-या उत्प्रेक्षेला 'वाच्योत्प्रेक्षा' आणि अशा शब्दांशिवाय भासणा-या उत्प्रेक्षेला गम्योत्प्रेक्षा म्हणतात. वर दाखविलेल्या तीन उदाहरणांमध्यें पहिल्या दोन उदाहरणांत वाच्योत्प्रेक्षा असून तिस-यांत गम्योत्प्रेक्षा आहे.

'सम्भावनमथोत्प्रेक्षो प्रकृतस्य समेन यत्' (काव्यप्रकाश) हें या अलंकाराचें सामान्य लक्षण असून 'उत्कटा प्रकृष्टस्य उपमानस्य ईक्षा उत्प्रेक्षा' अशी उत्प्रेक्षाशब्दाचि व्युत्पत्ति आहे.

१-१०७, १-११०, १-१३६, २-४४, २-७१, ३-१२, ३-२७, ३-६०.

११ मुद्रा

प्रकृत अर्थांत अन्वित असणा-या पदांनींच, त्या श्लोकांतलें वृत्त, त्या काव्याची रीती[१] अथवा पुढील कथाभाग इत्यादिकांचें मार्मिक रीतीनें सूचन केल्यास त्यास 'मुद्रा' (अलंकार) म्हणतात.

'विद्युद्भास्वत्स्वं परितोऽस्त्रं विधुनानं मेघध्वानं मेघरुचोऽलं हृतमानम्।

दृष्ट्वा मेघो भुव्यवतीर्णः किमिहास्ते मत्वापीत्थं **मत्तमयूरा** ननृतुस्ते।।' (१-१२८) या श्रीदत्तचम्पूच्या श्लोकांत प्रकृतार्थान्वित 'मत्तमयूर' शब्दांनें या श्लोकाच्या 'मत्तमयूर' वृत्ताचेंहि सूचन केल्यानें मुद्रालंकार आहे.

असाच - 'धन्यासि **वैदर्भि** ! गुणैरुदारैर्यया समाकृष्यत नैषधोऽपि ।

इतः स्तुति का खलु चन्द्रिकाया यदब्धिमप्युत्तरलीकरोति ।।'

(३-११६) या नैषध महाकाव्याच्या श्लोकांत दमयंतीच्या उद्देशानें वापरलेल्या 'वैदर्भि!' पदानें त्या काव्यांतील वैदर्भीनामक[२] रीतीचाहि अप्रत्यक्ष निर्देश केल्यानें तेथेंहि हा अलंकार निष्पन्न होतो.

संस्कृत भाषेंतल्या बहुतेक सर्व नाटकांत नांदीश्लोकानें पुढील कथाभाग सुचविला जात असतो. (शाकुंतल अनर्घराघव इत्यादि नाटकांतील नांदीश्लोकांची टीका पाहा.) त्या स्थळींहि हा अलंकार असतोच.

'सच्यार्थसूचनं मुद्रा प्रकृतार्थपरैः पदैः (कुवलयानंद) असें या अलंकाराचें लक्षण सांगितलें असून 'अर्थान्तरसूचनेन मुदं सन्तोषं राति ददातीति मुद्रा, मुद्रा (शिक्का-मोहोर) सदृशत्वाद्वा मुद्रा' अशी मुद्रा शब्दाची व्युत्पत्ति होऊ शकते.

१-१२८, १-१५०, ३-४४, ३-४५, ३-४६, ३-४७, ३-४८, ३-४९, ३-१००.

(१) 'पदसङ्घटना रीतिरङ्गसंस्थाविशेषवत् । उपकर्त्री रसादीनाम् । (साहित्यदर्पण)

(२) माधुर्यव्यञ्जकैर्वर्णै रचना ललितात्मिका ।
अवृत्तिरल्पवृत्तिर्वा वैदर्भी रीतिरिष्यते ।। (साहित्यदर्पण)

१२ अपन्हुतिः

उपमानोपमेयांचा अभेद वर्णन करण्याकरितां उपमेयाचा किंवा उपमानाचा निषेध केल्यास म्ह. 'हें उपमेय नसून उपमान आहे. (अथवा) उपमान नसून उपमेय आहे' असें वर्णिल्यास 'अपन्हुति' हा अलंकार होतो. हा निषेध बहुतेक अभेदारोपाला उपपादक (अङ्ग) व कचित्स्थळीं उपपाद्या (अङ्गी) हि असतो. 'न नो' इत्यादि शब्दांनीं तो (निषेध) सांगितला, अथवा 'कपट, मिष' इत्यादि सुचविला, किंवा मूर्ख लोक असें म्हणतात. ' इत्यादि रीतीने व्यक्त केला तरी हरकत नाहीं. [अभेदप्रदिपत्तिनिरूपिताङ्गाङ्गित्वान्यतरवान्निषेधोऽपन्हुतिरिति अपन्हुतिसामान्यलक्षणम्। निषेधश्च नञादिसत्त्वे वाच्य, क्वचित्तु तदभावात्कैतवादिपदैः पर-मतत्त्वोपन्यासदिभिश्च व्यङ्गयः (चंद्रिका)] रूपकामध्यें अभेदारोप असला तरी निषेध नसतो. अर्थात् रूपकास - उपमानोपमेयांच्या आहार्याभेदारोपास-वर दाखविल्याप्रमाणें निषेधाची पुस्ती जोडली कीं 'अपन्हुति ' तयार.

'नेदं नभोमण्डलमम्बुराशिर्नैताश्च तारा, नवफेनभङ्गाः ।

नायं शशी, कुण्डलितः फणीन्द्रो नासौ कलङ्कः शयितो मुरारिः।। (साहित्यदर्पण) या श्लोकांत 'हें आकाशमण्डल नसून समुद्र आहे.' इ. रीतीनें उपमेयनिषेधपूर्वक उपमानाभेद वर्णिल्यानें 'अपन्हुति' आहे. या स्थळीं निषेध ('न' शब्द-) वाच्य असून अभेदारोपाला उपपादक अर्थात् अंगभूत आहे.

'अत्यानन्दयति स्वान्तं, धनं किं, न, गुरोः पदम्' या (भ्रान्तापन्हुतीच्या) उदारणांतहि निषेध वाच्यच आहे. पण तो उपपादक नसून स्वतःच उपपाद्य म्ह. 'अङ्गी' असा आहे.

'जातमात्रं तु तं वीक्ष्य बोधदुग्धमपाययत् । स्तन्यं तु प्राणधृतय उल्लापनमिषेण सा ।।" (स्तबक २ श्लोक १९) या आपल्या चम्पूश्लोकांतहि हाच अलंकार आहे. या ठिकाणीं निषेध ('नेदमुल्लापनम्, किन्तु बोधदुग्धपानम्' अशा रीतीनें) साक्षात् न सांगतां ('उल्लापनमिषेण' अशा) पर्यायानें सुचविला आहे.

'प्रकृतं यन्निषिध्यान्यत्साध्यते सा त्वपन्हुतिः।' असें, काव्यप्रकाशांत या अलंकाराचें लक्षण सांगितलें असून 'अपन्हूयते निषिध्यते उपमानमुपमेयं वा अत्र इति अपन्हुतिः' अशी या शब्दाची व्युत्पत्ति आहे. २-१९.

१३ व्यतिरेकः

उपमेय हें उपमानापेक्षां उत्कृष्ट अथवा निकृष्ट असल्याचें वर्णिल्यास 'व्यतिरेक' हा अलंकार होतो. ['उपमानादुपमेयस्य..... येन केन प्रकारेण उत्कर्षः, अथवा उपमानादुपमेयस्य...... येन केन प्रकारेण निकर्षो व्यतिरेकी नामालङ्कारः स्यात्। एतेन उपमानोपमेययोर्यत्किञ्चिद्वैधर्म्यं व्यतिरेक इति लक्षणं फलितम्' (कुसुमप्रतिमा=साहित्यदर्पणटीका). 'किञ्चिद्धर्मप्रयुक्तसाम्यवत्तया प्रतीयमानयोः किञ्चिध्दर्मप्रयुक्तवैलक्षण्यं व्यतिरेकशरीरम्।' (चन्द्रिका)]

'निष्कलङ्कं' दत्तमुखं शशाङ्कादतिरिच्यते' या वाक्यांत, मुखाच्या (म्ह. उपमेयाच्या) ठिकाणीं चंद्रा (म्ह. उपमाना) पेक्षां निष्कलंकत्वरूपी आधिक्य म्ह. उत्कर्ष वर्णिला असल्यानें उपमेयाधिक्यापर्यवसायी व्यतिरेक आहे.

'स्वनाम यन्नाम मुधाभ्यधामहं महेन्द्रकार्यं महदेतदुज्झितम्।
हनूमदाद्यैर्यशसा मया पुनर्द्विषां हसैर्दूतपथः सितीकृतः ।।'

या नैषध महाकाव्याच्या (सर्ग ९ श्लोक १२३) श्लोकांत उपमानापेक्षां उपमेयाचा म्ह. मारुतीपेक्षां नलराजाचा अपकर्ष वर्णिला आहे. म्हणून उपमेयन्यूनत्वपर्यवसायी व्यतिरेक आहे. या दोन्ही उदाहरणांमध्यें हा अलंकार शुध्द श्लेषासंकीर्ण असून आपल्या दत्तचम्पूच्या 'क्षमैकभद्रासनानां--' या गद्यांत मात्र हा (व्यतिरेक) श्लेषमूलक आहे.

साहित्यदर्पणकारांनीं या अलंकाराचे एकंदर अठ्ठेचाळीस (४८) भेद सांगितले असून 'आधिक्यमुपमेयस्योपमानान्न्यूनताऽथवा। व्यतिरेकः' असें याचें सामान्य लक्षण दिलें आहे. 'व्यतिरिच्यते=उपमानादुपमेयं किञ्चिद्वैषम्येणावगम्यते येन स व्यतिरेकः' (सा.द.टी.) अशी, व्यतिरेक शब्दाची व्युत्पत्ति आहे. २-३८, ३-६, ३-७, ३-८, ३-६०.

१४ दृष्टान्तः

उपमान, उपमेय, (असतील तितके) संबंधी पदार्थ, आणि साधारण धर्म या सर्वांचा बिंबप्रतिबिंबभावानें निर्देश केला तर 'दृष्टान्त' हा अलंकार होतो. [प्रकृतवाक्यार्थघटकानामुपमानादीनां साधारणधर्मस्य च बिम्बप्रतिबिम्बभावे दृष्टान्तः। (रसगंगाधर) हा अलंकार तयार होण्याला दोन वाक्यें असावीं लागतात. एकांत उपमेय; संबंधी पदार्थ आणि साधारणधर्म यांचा निर्देश असतो तर दुस-यांत, उपमान; संबंधी पदार्थ आणि साधारण धर्म यांचा निर्देश असतो. या दोन्ही वाक्यांतले सगळे पदार्थ- म्हणजे उपमान आणि उपमेय, सगळे संबंधी पदार्थ आणि दोन्ही साधारण धर्म हे - वस्तुतः परस्परभिन्न असतात. पण ते परस्पर अगदी सदृश असल्यामुळें त्यांना अभिन्न-जणूं एकाचें प्रतिबिंबच दुसरें असें मानून (हि) भिन्न शब्दांनी त्यांचें ग्रहण केलें जातें. यालाच 'बिम्बप्रतिबिम्बभाव' म्हणतात. [वस्तुतो भिन्नयोरप्युपमानोपमेयधर्मयोः परस्परसादृश्यादभिन्नयोः पृथगुपादानं बिम्ब्रतिबिम्बभावः (कुवलयानंद)] हे दोन्ही वाक्यार्थ सामान्यतः निराकांक्ष असले तरी उपमानवाक्यार्थानें उपमेयवाक्यार्थाचें समर्थन केलें जातें. सरते शेवटी या दोन्ही वाक्यार्थांचे पर्यावसान सादृश्यामध्यें होते.

अविदितगुणापि सत्कविभणितिः कर्णेषु वमति मधुधाराम् ।

अनधिगतपरिमलाऽपि हि हरति दृशं मालतीमाला ।। (वासवदत्ता) हें दृष्टान्तलंकाराचें उदाहरण असून यांतल्या पदार्थांची व्यवस्था अशीं आहे- सत्कविभणिति-उपमेय, मालतीमाला-उपमान, अविदितगुणत्व आणि अनधिगतपरिमलत्व-संबंधीं पदार्थ (विशेषण), मधुधारावमन आणि दृग्घरण (दृष्ट्याकर्षण) साधारणधर्म. सत्कविभणिति आणि मालतीमाला हे दोन्ही पदार्थ वस्तुतः भिन्न असून यांतल्या अतिशय सादृश्यामुळें हे (सहृदयांना) अभिन्नच भासतात. (तरी पण) यांचा निर्देशमात्र भिन्न भिन्न शब्दांनींच केला आहे. संबंधी पदार्थ आणि साधारण धर्म यांचीहि हीच स्थिती आहे. अर्थात् या सर्वांमध्ये 'बिंबप्रतिबिंबभाव' आहे. म्हणून या ठिकाणीं 'दृष्टान्त' हा अलंकार आहे.

श्रीदत्तचंपूच्या 'द्वयतोऽद्वयमात्मविद्यया पुनरैक्यं न भजेत्पृथक्कृतम् । मथनेन पृथक्कृतं पुनर्नवनीतं नहि तक्र ऐक्यभाक् ।।' (२-५६) या श्लोकांतहि, उपमानोपमेयादिकांचा बिंबप्रतिबिंबभाव ; उपमानवाक्यार्थानें उममेयवाक्यार्थाचें समर्थन; विचाराअन्तीं दोन्ही वाक्यार्थांचें सादृश्यांत पर्यवसान हें सगळें असल्यानें दृष्टान्तालङ्कारच आहे. (विशेष शंकासमाधानांकरितां त्रिशति सर्ग ३, श्लोक १०४ पाहा.)

काव्यप्रकाशकारांनीं या अलंकाराचें लक्षण -' दृष्टान्तः पुनरेतेषां सर्वेषां प्रतिबिम्बनम्' असें सांगितलें आहे. या शब्दाचीं व्युत्पुत्ति-'दृष्टः अन्तः निश्चयः यस्मिन् सः दृष्टान्तः [एवं च यत्र दृष्टान्तवाक्येन दार्ष्टान्तिकवाक्यार्थनिश्चयस्य प्रामाण्यग्रहो भवति स दृष्टान्त.... इत्यर्थः । 'अन्तोऽध्यवसिते मृत्यौ स्वरूपे निश्चयेऽन्तिके' इति वैजयन्ती । (का.प्र.टी.)] अशी आहे. (१) २-५६.

(१) या दृष्टांतालंकारामध्यें दोन वाक्यांत दोन विभिन्न साधारण धर्म असून त्यांमध्यें बिंबप्रतिबिंबभाव असतो ही गोष्ट आतां आपल्या ध्यानीं आलींच आहे. पण तो साधारण धर्म दोन्ही वाक्यांमध्यें वस्तुतः एकच, असून विभिन्न शब्दांनीं प्रतिपादिला गेला असेल तर (अशा प्रतिपादनाला 'वस्तुप्रतिवस्तुभाव' अशी संज्ञा आहे. ['एकस्यार्थस्य शब्दद्वयेनाभिधानं वस्तुप्रतिवस्तुभावः' का.प्र.टी.] 'प्रतिवस्तूपमा' हा अलंकार होतो. [यत्रोपमानोपमेयवाक्ययोरेकः समानो धर्मः पृथङ्निर्दिश्यते सा प्रतिवस्तूपमा । प्रतिवस्तु प्रतिवाक्यमुपमा समानधर्मोऽस्यामिति व्युत्पत्तेः । (कुवलयानंद)बाकी - दोन्ही वाक्यार्थांमध्यें समर्थ्यसमर्थकभाव, शेवटी औपभ्यामध्यें पर्यवसान हें- सगळें दृष्टान्तालंकारासारखेंच.

तवामृतस्यन्दिनि पादपङ्कजे निवेशितात्मा कथमन्यदिच्छति ।
स्थितेऽरविन्दे मकरन्दनिर्भरे मधुव्रतो नेक्षुरसं समीश्चते ।। (कुवलयानंद)

या भक्तोक्तींत दोन्ही वाक्यांमध्यें, 'कथमिच्छति? न समीक्षते' या विभिन्न शब्दांनीं 'अनिच्छ'रूपी एकच साधारण धर्म सांगितला असल्यानें 'प्रतिवस्तूपमा' हा अलंकार आहे. अप्पय्यदीक्षितांनीं या अलंकाराचें लक्षण- 'वाक्ययोरेकसामान्ये प्रतिवस्तूपमा मता' असें दिलें आहे. व्युत्पत्ति वर दाखविलीच आहे.

१५ अर्थान्तरन्यासः

'काव्यलिङ्गम्' पहा. २-९८, ३-१९, ३-२०, ३-९५.

वृत्तें

अक्षरें किंवा मात्रा यांच्या नियत **परिमाणा**ला (**यदक्षरपरिमाणं तच्छन्दः।**) 'छंद' अथवा 'वृत्त' अशी संज्ञा आहे. अर्थात् 'अक्षरवृत्त, मात्रावृत्त' असें वृत्तांमध्यें दोन प्रकार आहेत.

अक्षरवृत्त

ज्यांत अक्षरांची संख्या ठराविक असते तें अक्षरवृत्त, प्रत्येक वृत्तांत (म्ह. वृत्तघटित श्लोकांत) चार पाद म्ह. भाग असतात. ते सगळे एकसारखे असल्यास ते **'समवृत्त'** होय.(**अङ्घ्रयो यस्य चत्वारस्तुल्यलक्षणलक्षिताः । तच्छन्दःशास्त्रतत्त्वज्ञाः समं वृत्तं प्रचक्षते ।। प्रथमाङ्घ्रिसमो यस्य तृतीयश्चरणो भवेत्। द्वितीयस्तुर्यवद्वृत्तं तदर्धसममुच्यते ।। यस्य पादचतुष्केऽपि लक्ष्म भिन्नं परस्परम् । तदाहुर्विषमं वृत्तं छन्दःशास्त्राविशारदाः ।।**) पहिला आणि तिसरा हे दोन पाद एका त-हेचे व दुसरा आणि चौथा हे एका त-हेचे असल्यास तें वृत्त 'अर्धसम' आणि ज्याचे सर्व पाद एकमेकांपासून भिन्न तें 'विषम'. पहिला व तिसरा या पादांना 'विषम, अयुग्म, ओज' अशा, व दुसरा आणि चौथा या पादांना 'सम, युग्म, अनोज' अशा संज्ञा आहेत. प्रचारांत असलेल्या वृत्तांमध्यें अर्धसम आणि विषम यांपेक्षा समवृत्तांची संख्या फार मोठी आहे. या समवृत्तांच्या (**आरभ्यैकाक्षरात्पादादेकैकाक्षर वर्धितैः । पृथक्छंदो भवेत्पादैर्यावत् षड्विंशतिं गतम् ।। उक्ताऽत्युक्ता तथा मध्या प्रतिष्ठान्या सुपूर्विका । गायत्र्युष्णिगनुष्टुप् च बृहती पङ्क्तिरेव च ।। त्रिष्टुप् च जगती चैव तथाऽतिजगती मता । शक्वरी साऽतिपूर्वा स्यादष्ट्यत्यष्टी ततः स्मृते ।। धृतिश्चातिधृतिश्चैव कृतिः प्रकृतिराकृतिः । विकृतिः सङ्कृतिश्चैव तथाऽतिकृतिरुत्कृतिः ।।**) एकेका पादांत एकापासून (क्रमानें एकेक अक्षर वाढत) सव्वीसापर्यंत अक्षरें असलीं म्हणजे तयार होणा-या सव्वीस प्रकारांना 'जाति' अशी संज्ञा आहे. या सव्वीस जातींचीं नांवें क्रमानें अशीं आहेत. - १ उक्ता, २ अत्युक्ता, ३ मध्या, ४ प्रतिष्ठा, ५ सुप्रतिष्ठा, ६ गायत्री, ७ उष्णिक्, ८ अनुष्टुप्, ९ बृहती, १० पङ्क्ति, ११ त्रिष्टुप्, १२ जगती, १३ अतिजगती, १४ शक्वरी, १५ अतिशक्वरी, १६ अष्टि, १७ अत्यष्टि, १८ धृति, १९ अतिधृति, २० कृति, २१ प्रकृति, २२ आकृति, २३ विकृति, २४ सङ्कृति, २५ अतिकृति, २६ उत्कृति. यांतल्या प्रत्येक जातींत अवांतर अनेक प्रकार होतात. उदाहरणांत प्रत्येक पादांत एकेक याप्रमाणें चार अक्षरें असलीं कीं 'उक्ता' तयार होते हें आपण वर पाहिलेंच आहे. हीं चारीं अक्षरें 'लघु' ठेविली तर पहिला आणि 'गुरु' ठेविलीं तर दुसरा असे यांत दोन प्रकार होतात. याच रीतीनें अत्युक्तेचे चार, मध्येचे आठ, प्रतिष्ठेचे सोळा, असे दुपटीनें वाढात वाढत शेवटच्या म्ह. उत्कृति जातिचे '६७१०८८६४' इतके अवांतर प्रकार बनतात. या व अशा रीतीनें अर्धसम आणि विषम वृत्तांत संभवणा-या अनंत प्रकारांपैकी प्रचारांत असलेल्या कांहीं विवक्षित प्रकारांना 'श्री, स्त्री, नारी, तनुमध्या, मदलेखा, वसंततिलका, शिखरिणी, स्त्रग्धरा, हरिणप्लुता, पुष्पिताग्रा, कलिका, लवली, अमृतधारा इ. नांवें देऊन छंदःशास्त्रकारांनीं त्यांचें लक्षण वगैरे सांगितलें आहे. यांमध्यें कोणकोणतीं अक्षरें लघु किंवा गुरु असावीं हें सुलभतेनें सांगण्याकरितां आठ 'गण' कल्पिले आहेत. प्रत्येक गणांत तीन पूर्ण अक्षरें (स्वर अथवा स्वरसहित व्यंजनें) असतात. हीं तीन्ही अक्षरें गुरु, किंवा तीन्ही लघु, अथवा कांहीं गुरु व कांही लघु असूं

शकतात. असे प्रकार आठ होतात. हेच आठ 'गण' होत. लघु अक्षराबद्दल '।' व गुरु अक्षराबद्दल 'ऽ' अशीं चिन्हें वापरतात. हींच चिन्हें वापरून या आठ गणांची स्वरूपें व नांवे खालीं दिलीं आहेत. पहिल्या चार गणांच्या व्युत्क्रमानें दुसरें चार गण तयार होतात -

मगण=ऽऽऽ नगण=।।। यगण=।ऽऽ भगण=ऽ।।

रगण=ऽ।ऽ जगण=।ऽ। सगण=।।ऽ तगण=ऽऽ।

(**म्यरस्तजभ्नगैर्लान्तैरोभिर्दशाभिरक्षरैः । समस्तं वाङ्मयं व्याप्तं त्रैलोक्यामिव विष्णुना ।। सर्वगुर्मो मुख्रान्तर्लौ यरावन्तगलौ सतो । ग्मध्याद्यौ ज्भौ त्रिलो नोऽष्टौ भवन्त्यत्र गणास्त्रिकाः ।।**)

अ इ उ इत्यादि -हस्व अक्षरांना 'लघु ' ही संज्ञा आहे. आ ई ऊ इत्यादि दीर्घ (वा प्लुत) अक्षरांना 'गुरु' म्हणतात. '-हस्व' अक्षर देखील अनुस्वारसहित' असेल; (त्याच्या) पुढें विसर्ग किंवा द्वित्ताक्षर येईल तर 'गुरु' गणलें जातें. पादाच्या शेवटीं असलेलें -हस्वाक्षर आवश्यकतानुसारेण लघु अथवा गुरु कसेंहि मानायला हरकत नाहीं. 'प्र' आणि '-ह' या दोन्हींपैकीं एखादें द्वित्ताक्षर पुढें असलें तरी त्याच्या मागचें -हस्व अक्षर स्थलविशेषीं 'लघु' च मानले जातें. **(सानुस्वारो विसर्गान्तो दीर्घो युक्तपरश्च यः। वा पदान्ते त्वसौग्वक्रो ज्ञेयोऽन्यो मात्रिको लृजुः।।)**

अक्षरांची संख्या, प्रसिध्द (चत्वारि पञ्च इ.) संख्या वाचकशब्दांनीं न सांगतां 'अब्धि, भूत, रस' इ. लाक्षणिक शब्दांनीं सांगण्याची छंदः-शास्त्रांत वहिवाट आहे. (**अब्धि-भूत-रसादीनां ज्ञेयाः संज्ञास्तु लोकतः।**)असें कांही लाक्षणिक शब्द व तद्बोध्यसंख्याविशेष दिग्दर्शनाकरितां खालीं दिले आहेत -

अब्धि=४, भूत=५, रस=६, मुनि=७, वसु=८, ग्रह=९, दिशा=१०, रुद्र=११, आदित्य=१२ इ. इ.

उच्चारसौलभ्यार्थ घेतल्या जाणा-या विश्रान्तीला 'यति' म्हणतात. (**यतिर्विच्छेदसंज्ञितः । यतिः सर्वत्र पादान्ते श्लोकार्धे तु विशेषतः।**). ही प्रत्येक पादाच्या शेवटी असतेच शिवाय निरनिराळ्या वृत्तांत कितव्या अक्षरापुढें यति असावी याबद्दल विशिष्ट नियम आहेत.(**ज्ञेयाः सर्वान्तमध्यादिगुरवोऽत्र चतुष्कलाः । गणाश्चतुर्लघूपेताः पंञ्चार्यादिषु संस्थिताः।।**) वृत्तरत्नाकरादि ग्रंथामध्यें प्रत्येक वृत्ताच्या लक्षणांत बहुतेक त्याचा यतिनियमहि सांगितलाच आहे. यति असलेलें अक्षर पदाच्या शेवटचे असावें अर्थात् पदाच्या मध्यें यति होऊं नये. तसें झाल्यास ' यतिभङ्ग' (**उदाहरण - 'नमस्तस्मै महादेवाय शशाङ्कार्धधारिणे।'**) दोष सांगितला आहे. श्लोकार्थाच्या शेवटीं समास अपुरा(**उ. 'सुरासुरशिरोरत्नस्फुरत्किरणमञ्जरी- । पिञ्जरीकृतपादाब्जद्वन्द्वं वन्दामहे शिवम्'।।**) राहिला तरी हा दोष मानतात. 'भरत' वगैरे कांहीं ग्रंथकार, यतिनियम अजीबात मानीत नाहींत. अर्थात् त्यांच्या मतांत यतिभंग दोषहि नाहीं.

मात्रावृत्त

ज्यांत मात्रांची संख्या नियत असते तें मात्रावृत्त. लघु अक्षराची एक मात्रा व गुरु अक्षराच्या दोन मात्रा मानतात. चार मात्रांचा एक गण होतो. लघुगुरुभेदांमुळें असे गण पांच होतात -

सर्वगुरु	अन्त्यगुरु	मध्यगुरु	आदिगुरु	सर्वलघु
ऽऽऽ	।।ऽ	।ऽ।	ऽ।।	।।।

हीं मात्रावृत्तें बहुतेक अर्धसम अथवा विषम असतात. यांतल्या समवृत्तांना 'मात्रासमक' म्हणतात. 'आर्या, वैतालीय, मात्रासमक' हे मात्रा वृत्ताचे मुख्य प्रभेद होत. अक्षरवृत्तांप्रमाणें यांचेही अवांतर प्रभेद अनंत होतात. उ. 'पथ्या' आणि 'विपुला' हे आर्येच्या अनेक प्रभेदापैकीं दोन प्रभेद असून फक्त यांतल्या अवांतर प्रकारांची संख्याच १६,३८,४०,००० इतकी आहे. कांही मात्रावृत्तांत चार भाग (पाद) न मानतां दोन अर्धे मानलीं आहेत अशा वृत्तांना 'द्विखण्डक' म्हणतात.

छंदोग्रंथांत[७] सांगितलेलं कोणतेंहि लक्षण जमत नसेल अथवा तीन पांच सहा असे पाद असतील तर अशा वृत्तास 'गाथा' अशी संज्ञा आहे.

आपल्या श्रीदत्तचम्पूंत वापरलेल्या बहुतेक सगळ्या वृत्तांचीं लक्षणें वगैरे त्रिशतीकाव्याच्या वृत्तादिविवृतीमध्यें दिलींच आहेत. (त्रिशतीवृत्तानुक्रमाणिका पाहा.) आतां त्रिशतींत न आलेल्या (या चंपूंतल्या) पांच सात वृत्तांचीं लक्षणें वगैरे कशीं काय आहेत पाहूं. -

स्त.श्लो.	वृत्ताचें नांव	वृत्ताचें लक्षण	समन्वय
			स स स ल.गु.
१.४६	एक रूपम्	'उपचित्रमिदं सससा लगौ'	क्वचदो षउए षवदा न्यतः
			।।ऽ ।।ऽ ।।ऽ ।ऽ

विशेष माहिती - वृत्तरत्नाकरांत या वृत्ताचें नांव 'उपचित्रम्' असें आढळतें.

२-२० गीतम् हे मात्रावृत्त असून याच्या प्रत्येक पादांत बहुतेक १२ मात्रा आहेत. याचें विशिष्ट नांव किंवा लक्षण छंदो ग्रंथांत नसल्यानें याचा 'गाथा' मध्यें अंतर्भाव होतो.

२-२५ गीतिः 'उपचित्रा नवमे परयुक्ते' मास्वपमास्वपरे निजरूपे
(उपचित्रा) ऽ।।ऽ।।ऽ।।ऽऽ

हें वृत्त 'मात्रासमकां' पैकीं असून याच्या प्रत्येक पादांत सोळा मात्रा असतात. श्रीशंकराचार्यांच्या 'चर्पटपञ्जरिका' स्तोत्रांत हेंच वृत्त आहे.

२-१०० गीतिः। हें मात्रावृत्त असून बहुतेक याच्या प्रत्येक पादांत चौदा मात्रा आहेत. याचाहि 'गाथा' मध्येंच अन्तर्भाव मानावा लागतो. 'शांत हो श्रीगुरुदत्ता!' - या प्रसिध्द पदामध्यें श्रीमहाराजांनीं हेंच वृत्त वापरलें आहे.

म त न स गु.गु.

३-१९ असम्बाधा 'म्तौ न्सौ गावक्षग्रहविर शूरन्दा-तारंसु-रवर-सुतमु-त्तारम्

तिरसम्बाधा SSS- SS।- ।।।-।।S -SS

या श्लोकाच्या पहिल्या व शेवटच्या पादांमध्यें हें वृत्त जरा चुकतें.

३-२० अजराजिता 'ननरसलघुगैःस्वरैरपराजिता'

न न र स ल.गु.

प्रभूर-पिचत-थाविधा-त्मजल-ब्धये

।।। -।।। -S।S -।।S -। S

३-२१ प्रहरणकलिता 'नमभनलघुगैःप्रहरणकलिता

न न भ न ल.गु

सनिज-पुरम-गात्सुफ-लभिद-मदात्

।।। ।।। S।। ।।। ।S

३.२७ चित्रपदा 'भौगिति चित्रपदा गः' भ भ गु.गु.

चित्रप-दार्थसु-चौर्यात्

S।। S।। SS

सज्जनमानसहंसा ! चिन्नभहंसा[१] ! तुझ्या च या अंशा[२] ।

जनन - ध्वंसां वारुनि तारी बा ! वासुदेव परहंसा !।।

श्रीगुरुचरणार्पणमस्तु । ॐ तत्सत् ।।

(१) 'भानुर्हंसः सहस्त्रांशुः -' अमरसिंह. (२) 'ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः' - वासुदेव.